आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१० जानेवारी २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सरकारी योजनाची १०० टक्के अंमलबजावणी हेच सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षतेचं स्वरुप असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- १८व्या प्रवासी भारतीय दिन सोहळ्याचा राष्ट्रपतींच्या उपस्थितीत समारोप

- दिल्ली विधानसभा निवडणुकीची अधिसूचना जारी

- महाकुंभमेळ्यानिमित्त आकाशवाणीची विशेष वाहिनी ‘कुंभवाणी’ चं लोकार्पण

- महिला क्रिकेटमधे भारत आणि आयर्लंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेत राजकोट इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारताचा सहा गडी राखून विजय

**आणि**

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, भारताची, चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी ही जोडी पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत दाखल

**<><><><><>**

२०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन देशातल्या सर्व समस्यांचं निराकरण करायचं आहे असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आघाडीचे उद्योजक निखिल कामत यांना दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. सरकारी योजनाची १०० टक्के अंमलबजावणी

हेच सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षतेचे स्वरुप असल्याचं ते म्हणाले. माणूस म्हणून आपल्या हातूनही चुका झाल्या आहेत मात्र वाईट हेतूनं कधीही चूक केली नसल्याचं त्यांनी सांगितलं.

आजच्या जगात लोकशाहीमध्ये समाज माध्यम एक महत्त्वाचं साधन असून ते लोकशाहीला सक्षम बनवू शकतं, असं ते म्हणाले. देशातले तरुण, समाज माध्यमावरून माहिती मिळवत विविध मुद्द्यांमध्ये रस घेत असल्याचं त्यांनी सांगितलं. सध्याच्या जागतिक आव्हानांबद्दल बोलताना मोदी म्हणाले की, सरकार जागतिक शांततेच्या बाजूनं आहे.

**होल्ड बाईट मोदी**

या मुलाखतीत प्रधानमंत्र्यांनी त्यांचा जीवन प्रवास, शिक्षण, राजकीय जीवन, व्यवस्थापन क्षमता आणि इतर पैलूंवर चर्चा केली.

**<><><><><>**

परदेशस्थ भारतीय जगासमोर भारताचं खरंखुरं चित्र उभं करतात असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. १८व्या प्रवासी भारतीय दिन सोहळ्याच्या समारोप समारंभात आज त्या भुवनेश्वरमधे बोलत होत्या. वैद्यक आणि तंत्रज्ञानासह अनेक क्षेत्रात भारतीयांनी प्राविण्य मिळवलं आहे असं त्या म्हणाल्या.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १७ परदेशस्थ भारतीयांना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरवण्यात आलं. केंद्रीय मंत्री डॉ. एस जयशंकर, जुआल ओराम, धर्मेंद्र प्रधान तसंच ओदिशाचे राज्यपाल हरिबाबू

कंभमपाटी, मुख्यमंत्री मोहन चरण माझी आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

लिंगभाव समानता आणि महिला सबलीकरण हे भारताच्या परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय संबंधांचे अविभाज्य घटक असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी आज प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या चौथ्या दिवसाच्या अध्यक्षपदाच्या भाषणात केलं.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीची अधिसूचना आज जारी झाली असून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. १७ जानेवारीपर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येतील. तर २० जानेवारी पर्यंत उमेदवारी अर्ज मागं घेता येतील. या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी, भाजप आणि काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात होणाऱ्या महाकुंभ मेळ्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आकाशवाणीच्या 'कुंभवाणी' वाहिनीचं लोकार्पण आज उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते प्रयागराज इथे झालं. याच कार्यक्रमात त्यांनी 'कुंभमंगल धून'चं देखील उद्घाटन केलं. प्रसारभारतीचे अध्यक्ष डॉ. नवनीतकुमार सहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, दूरदर्शनच्या महासंचालक कांचन प्रसाद, तसंच आकाशवाणीच्या महांचालक

डॉ. प्रज्ञा पालिवाल आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. डॉ सहगल यांनी सांगितलं….

**होल्ड बाईट… सहगल**

या आकाशवाणी वाहिनीवरून, आजपासून २६ फेब्रुवारी पर्यन्त महाकुंभमध्ये होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमावर आधारित अनेक कार्यक्रम प्रसारित करण्यात येतील. सकाळी ५ वाजून ५५ मिनिटांपासून रात्री १० वाजून ५ मिनिटांपर्यंत, या वाहिनीचं प्रसारण सुरू राहील. ही एफ एम वाहिनी १०३ पूर्णांक ५ अंश मेगा हर्टझवर, न्यूज ऑन ए आय आर या ॲप तसंच वेव्हज ओ टी टी वर ऐकता येईल.

**<><><><><>**

संरक्षण क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी यासंदर्भातील धोरणांत काही सुधारणा करून मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारचा मुख्य भर असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज सांगितलं. एरो इंडिया २०२५ उपक्रमाच्या आधी नवी दिल्लीत आयोजित केलेल्या राजदूतांच्या बैठकीत अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. भारतानं संरक्षण आणि हवाई क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीनं केलेल्या सकारात्मक प्रगतीचा उल्लेखही संरक्षणमंत्र्यांनी आपल्या भाषणातून केला.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे भारत आणि आयर्लंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेत आज राजकोट इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं सहा

गडी, आणि ९३ चेंडू राखून विजय मिळवला. आयर्लंडन नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात फक्त ७ गडी गमावून २३८ धावा केल्या.. कर्णधार गॅबी लुईसनं ९२ तर लीह पॉलनं ५९ धावा केल्या. भारतातर्फे प्रिया मिश्रानं २, तर सायली सातघरे, दिप्ती शर्मा, टायट्स साधू यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

विजयासाठी २३९ धावांचं लक्ष्य भारतानं ३५ व्या षटकातच ४ गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. प्रतिका रावलनं ८९, तेजल हसबनीसनं नाबाद ५३ धावा केल्या. कर्णधार स्मृती मंधनानं ४१, धावांचं योगदान दिलं. रिचा घोषनं २ चेंडूत २ चौकार मारत भारताची धावसंख्या २४१ वर नेली.

**<><><><><>**

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या, चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी या जोडीनं पुरुष दुहेरीची उपांत्य फेरी गाठली आहे.

आज झालेल्या सामन्यात भारतीय जोडीनं मलेशियाच्या अयुब अझ्रियन आणि तान वी कियोंग या जोडीचा २६-२४,२१-१५ असा पराभव केला. उपांत्य फेरीत चिराग आणि सात्विकची लढत कोरियन जोडीशी होईल.

**<><><><><>**

नवी दिल्लीमध्ये येत्या १३ ते १९ जानेवारी दरम्यान होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या भारतीय पुरूष संघात

महाराष्ट्रातल्या पाच तर महिला संघात तीन खो-खो-पटूंची निवड झाली आहे. पुरूष संघाच्या कर्णधारपदी पुण्याचा प्रतिक वाईकर आणि महिला संघाच्या कर्णधारपदी पुण्याचीच प्रियंका इंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><><>**

एच एम पी व्ही हा विषाणू देशासाठी नवा नसला, तरीही संसर्गजन्य आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये, मात्र काळजी घ्यावी, असं आवाहन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रताप जाधव यांनी केलं आहे. ते आज यवतमाळ इथं बातमीदारांशी बोलत होते. आपल्या सर्व व्यवस्था सज्ज असून आत्तापर्यंत आढळून आलेले रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत, असं त्यांनी सांगितलं…

**बाईट- प्रतापराव जाधव**

**<><><><><>**

देशात अनेक राज्यांत थंडीची लाट आणि घनदाट धुक्याची चादर कायम आहे. राजधानी नवी दिल्ली आणि एनसीआर परिसरात दाट धुक्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झालं आहे. रेल्वे, हवाई वाहतुकीवर तसंच रस्ते वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. आज सकाळी दृश्यमानता अधिकच खराब असल्यानं इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सुमारे १५० हून अधिक विमानांची उड्डाणं विलंबाने होत आहेत.

**जम्मू आणि काश्मीर पंजाब, हरियाणा, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेशासाठी** ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. **हिमाचल** प्रदेशातही उद्या आणि परवा पावसाची तसंच थंडीच्या लाटेची शक्यता वर्तवत हवामान विभागानं राज्याला यलो अलर्ट जारी केला आहे. **बिहार, झारखंड, ओदिशा आणि ईशान्येकडील** राज्यांतही थंडीची लाट आणि घनदाट धुक्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात १३ माओवाद्यांनी पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण केलं आहे. या माओवाद्यांवर एकूण १३ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. छत्तीसगड सरकारच्या पुनर्वसन धोरणांतर्गत आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना प्रत्येकी पंचवीस हजार रुपये देण्यात आले.

**//<><><><><>//**